अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील महत्वाच्या स्थळांचा विकास करणे याअंतर्गत बौध्द समाज सांस्कृतिक मंडळ, कल्याण (प), जि.ठाणे या संस्थेच्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व बहुउद्देशिय सामाजिक व सांस्कृतिक केंद्र बांधकामाकरीता निधी मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : स्वंसेअं-२०१७/प्र.क्र.१६३/बांधकामे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ३१ मार्च, २०१८.

<u>वाचा :-</u>

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२०१४/ प्र.क्र.६१/ बांधकामे, दि.१६/१२/२०१५.
२) शासन शुध्दीपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२०१४/ प्र.क्र.६१/ बांधकामे, दि.५/३/२०१८
३) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र. सकआ/ मावक/ऐति.स्थळे/ बौससांमंक/२०१७ -१८/का-१२/१४०३, दि.२७/९/२०१७.
४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन पत्र, क्र. बैठक-२०१७/ प्र.क्र.३९४/ बांधकामे, दि.१५/१२/२०१७ चे इतिवृत्त.

<u>प्रस्तावना</u> : -

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील मान्यवर व्यक्तींची स्मारक बांधणे तसेच महत्वाच्या सांस्कृतिक व ऐतिहासीक स्थळांचा विकास करण्याच्या दृष्टीने स्वयंसेवी संस्थांना अनुदान मंजूर करण्याविषयीचे निकष मार्गदर्शक तत्वांना संदर्भ क्र. १ व संदर्भ २ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या विहित कार्यपध्दती नुसार संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये, आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी, बौध्द समाज सांस्कृतिक मंडळ, कल्याण (प), जि.ठाणे संस्थेचा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन व बहुउद्देशिय सामाजिक व सांस्कृतिक केंद्र बांधकामाकरीता सादर करण्यात आलेला रु. ७,६७,००,०००/- (रुपये सात कोटी सदुसष्ट लाख फक्त) इतक्या रकमेचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर केला असता सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित केल्यानुसार रु.८,०१,७०,०००/- (रुपये आठ कोटी एक लाख सत्तर हजार फक्त) इतक्या अंदाजपत्रकास मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील सचिव समितीच्या दि.२०/३/२०१८ च्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने विषयांकित कामाच्या रु.८,०१,७०,०००/- (रुपये आठ कोटी एक लाख सत्तर हजार फक्त) रकमेस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

बौध्द समाज सांस्कृतिक मंडळ, कल्याण (प), जि.ठाणे या संस्थेचा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन व बहुउद्देशिय सामाजिक व सांस्कृतिक केंद्र बांधकामास सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित केल्यानुसार रु.८,०१,७०,०००/- (रुपये आठ कोटी एक लाख सत्तर हजार फक्त) इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास खालील अटींच्या अधीन राहून, या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. एकूण अंदाजपत्रकीय मान्य रकमेत शासनाचा हिस्सा ९० टक्के इतका व संबंधित संस्थेचा हिस्सा १० टक्के इतका असेल.:-

१) सदर वास्तुचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर सदर इमारतीवर सामाजिक न्याय विभागाचा ९०% अधिकार/मालकी असेल. त्याप्रमाणे इमारतीच्या प्रवेश द्वारावर उपरोक्त बाबीचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा व याबाबतचा करारनामा संबंधित प्रादेशिक उपायुक्त व संस्था यांच्यामध्ये करण्यात यावा.

२) काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरु करावे.

३) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

४) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/ता.क्र.१, दि.१० जानेवारी,२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

५) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र.बीडीजी-२०१७/ प्र.क्र.६०/ इमारती-२, दि.७/७/२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

६) प्रस्तावित बांधकामाची जागा सदर संस्थेच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

७) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२०१४/ प्र.क्र.६१/ बांधकामे, दि.१६/१२/२०१५ मधील नमूद अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करावे.

८) सदर कामासाठी शासनाचा सहभाग ९०% म्हणजेच रु.७,२१,५३,०००/- राहिल व संस्थेचा सहभाग १०% म्हणजेच रु.८०,१७,०००/- राहिल.

२. संदर्भ क्र. १ व २ येथील शासन निर्णयात नमूद मार्गदर्शक तत्वांचे पालन करुन बौध्द समाज सांस्कृतिक मंडळ, कल्याण (प), जि.ठाणे या संस्थेच्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन व बहुउद्देशिय सामाजिक व सांस्कृतिक केंद्र बांधकामाच्या प्रकल्पावर संनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी सदर शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तर समितीची राहील. वर नमूद सर्व अटी बौध्द समाज सांस्कृतिक मंडळ, कल्याण (प), जि.ठाणे यांना मान्य असल्याबाबत करारपत्र करुन घ्यावे. शासनाच्या वतीने करारपत्रावर सही करण्यासाठी प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, ठाणे यांनी प्रकल्पाच्या बांधकामाच्या सद्य:स्थितीचा त्रैमासिक अहवाल आणि वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास व आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना वेळीच सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३ सदर बांधकामावरील खर्च हा मागणी क्र.एन-३, २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०१- अनुसूचित जातीचे कल्याण, ८००-इतर खर्च, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (०५), स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदाने (०५)(०२),स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदाने (वि.घ.यो.) (२२२५ ३६३६), ३१ - सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (योजनातर्गत-दत्तमत्त) या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या वर्षात मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर योजनेअंतर्गत आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक, आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच योजनेअंतर्गत मंजूर निधीचे वितरण हे संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयातील परिच्छेद २ (२) मध्ये नमूद अटीच्या अधीन काटेकोरपणे करण्याची जबाबदारी आयुक्त, समजाकल्याण, पुणे यांची राहील.

५. प्रस्तुतचा शासन निर्णय, वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग-पाच, अनु.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र.२०१८०३३११०२८५६२९२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2018.03.31 17:54:09 +05'30'

(अनिल कों.आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
२) उपसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती-२), मंत्रालय, मुंबई-३२.
३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,मुंबई.
४) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे.
५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे .
६) महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा/लेखाअनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
७) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग,मुंबई.
८) सहायक आयुक्त, समाजकल्याण, ठाणे.
९) जिल्हाकोषागार अधिकारी, ठाणे.
१०) अध्यक्ष/सचिव, बौध्द समाज सांस्कृतिक मंडळ, कल्याण (प), जि.ठाणे
११) निवडनस्ती.